क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबइ - ४०० ०१९.

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ३३ दिनांक १ /०४/२००६

विषय : म.रा.वि.वितरण कंपनीतील कनिष्ठ यंत्रचालक पदावर काम करणा-या कर्मचा-यांना सा.आ.क्र.७४(क) दि.३०.४.७४ अन्वये उच्च वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करणेबाबत.

----------

तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात कनिष्ठ यंत्रचालक या पदावर काम करणा-या कर्मचा-यांना सा.आ.क्र.७४(क) दि.३०.४.७४ चे सुधारपत्र क्र.२७ दि.२१.५.१९९८ व सामान्य आदेश क्र.१४(क) दि.११.४.१९६३ चे सुधारपत्र क्र. ६१ दि.१८.११.१९९९ मधील तरतुदीनुसार संबंधित परिमंडलातील अधीक्षक अभियंता, अति उच्च दाब सं व सु मंडल यांचे कार्यालयांकडून प्रथम लाभ ६ वर्ष पूर्ण झाल्यानंतर व द्वितीय लाभ प्रथम लाभ मिळाल्याच्या तारखेपासून ९ वर्ष पूर्ण झाल्यानंतर मंजूर करण्यात येत होते.

२. आता म.रा.वि.मंडळाचे पूनर्रचना झाल्यानंतर, म.रा.वि.वितरण कंपनीमध्ये काम करणा-या कनिष्ठ यंत्रचालकांना उच्च वेतनश्रेणी मंजूर करण्याकरिता सक्षम अधिकारी कोण रहातील इत्यादी प्रश्न क्षेत्रीय कार्यालयांकडून उपस्थित करण्यात येत आहेत.

३. वरील प्रश्नांचा साकल्याने विचार करण्यात येऊन त्याबाबत खालील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे. :-

**खुलासा** : सद्यस्थितीत ज्या सं व सु मंडलाच्या आस्थापनेवर संबंधित कनिष्ठ यंत्रचालक कार्यरत आहेत, त्याच सं व सु मंडलाचे अधीक्षक अभियंता हे, संबंधित परिमंडलाचे आस्थापना अधिकारी किंवा उप आस्थापना अधिकारी यांचेशी विचार विनिमय करुन त्यांना सा.आ.क्र.७४ (क) अंतर्गत उच्च वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्या संबंधी निर्णय घेतील.

४. सा.आ. ७४ (क) दि.३०.४.७४ मधील इतर विद्यमान तरतूदी/नियम अबाधित रहातील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक व्यवस्थापकीय संचालक ( म.रा.वि.वितरण कंपनी मर्या.) यांनी दिलेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सु.यपाटील

**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रति,
म.रा.वि.वितरण कंपनीच्या विभागीय व त्यावरील स्तराच्या कार्यालयांपर्यंत प्रेषण यादीनुसार

Adm.Circular-FN-5/skw